# प्रज्ञा दया पवार

## चिरव्याकुळ एकाकीपणाच्या होर्डिंग्जवर

‘आठ मार्चच कशाला
आता प्रत्येकच दिवस
आमचा असतो’
असा करावा का शेवट
सदरहू कवितेचा
उदारीकरणाच्या या तिठ्यावरून
आणि अधून मधून पेराव्यात ओळी
जालीम उपरोधाच्या
विद्रोही-बिद्रोही
लिहावेत तपशील हिंसेचे, भयाचे,
मारले जाण्याचे
जसे लिहित आलो आम्ही
न जाणो कुठल्या तारखेपासून
डोमेस्टिक व्हायोलन्स
ते वर्ल्ड कपसारखा
सार्वजनिक थरार बलात्काराचा.
तारखाच बदलल्या फक्त
किंचाळणाऱ्या अंधारात
हात पाय झाडणाऱ्या
दिवसाउजेडात
वेदनेनं विव्हळणाऱ्या.

या चिरव्याकुळ एकाकीपणाच्या होर्डिंग्जवर
उभं राहून आम्ही पसरवतोय
आमच्या मोकळ्या ढाकळ्या
हाडामांसाच्या प्रतिमा
प्रश्न हा नाहीये
की कुणी खाल्ली
मोहाची फुलं पहिल्यांदा
सगळे भौतिक संदर्भ छाटून
त्या धूर्त लिओनार्दोनं करून टाकलं
आम्हाला गूढ वगैरे
सोपंच अस्तंय हे
एकतर मोनालिसात रुपांतरण करणं
नाहीतर बाजारपेठेच्या मुक्त वाऱ्यावर
पाशवी रक्तानं भिजलेली
आमची अंतर्वस्त्र
निर्ममपणे सुकायला टाकणं

आम्ही फोडतोय
अजूनही तीच गुहा
तीक्ष्ण धारदार हत्यारांनी
तू घुमव तुझा आवाज
शेवटच्या धापा टाकणाऱ्या
या ग्लोकल रणधुमाळीत

राहिला मुद्दा आठ मार्चचा
जिवंत धडधडीचा
गुहा फोडण्याचा
पुन्हा पुन्हा

**प्रज्ञा दया पवार**
ठाणे

(साभार पुनर्मुद्रित)

# नीलिमा श्रुतिश्रवण

## ओळख

जवळचे वाटायला लागले आहेत
कचरा गोळा करणारे
गल्लोगल्लीची, प्रत्येक घरची घाण साफ करणारे
लोक
शिव्या देतात
पचकन थुंकतात
भसकन ओरडतात
व्हसकन येतात अंगावर
गुरगुरतात सतत
रागात असतात सगळ्या जगावर
का? ते आता समजायला लागलंय
ओळखीचं हसून
नमस्कार करायला
सरसावतात हात आजकाल त्यांना
आरशातच दिसायला लागलेत ते
हुबेहुब अगदी जसेच्या तसे
हं पण जरा बऱ्या वेशात
आणि हो बिनपगारी
कित्येक वर्ष लागलीत
ओळखून घ्यायला
कधी प्रेमाने
कधी रागाने
कधी हसत हसत
अगदी सहज
पटवूनच दिली आहे
ही पक्की ओळख समोरुन

## वळ

वळ उठतात
माझ्याही अंगावर
त्या वळात दिसतात मला
मुसमुसणाऱ्या
घुसमटणाऱ्या
भेदरणाऱ्या
अगतिक
असंख्य बायका
कायदा डोक्यात ठेवणाऱ्या
अन् कृतीत न उतरविणाऱ्या
निमूट बायका

## झाड

कुठं रुजतच नाहीत
या आकाशव्यापी
वृक्षाची मुळे
रुजूच दिली जात नाहीत
संभार तेवढा हवा आहे
सगळाच्या सगळा
पण मुळांना सामावून घेईल
अशी कसदार जमीन
देत नाही कुणी
हीच खरी मेख आहे
म्हणजे आभाळासारखंच टोलवता येतं
वरच्यावर झाडालाही
अधांतरी
अन् सावली तेवढी
घेता येते ओढून
जाता येता
हवी तेव्हा कुणालाही

***नीलिमा श्रुतिश्रवण*** *यांनी काही कविता २०१९च्या दिवाळी अंकासाठी पाठवल्या होत्या. त्यातली एक वैषम्य या शीर्षकाची कविता तेव्हा प्रसिद्ध झाली होती. त्यांच्या अन्य कविता प्रसिद्ध करीत आहोत. दिवाळीनंतर त्यांचा अकाली मृत्यू झाला. वाटसरू परिवारातर्फे त्यांना विनम्र आदरांजली..*